८२०

महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई/नागपूर
यांना उद्देशून केलेला पत्रव्यवहार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग.
शासन परिपत्रक क्रमांक एफआरआर-१०८५/सीआर-३२६/जोईएन-५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २४ जून १९८५.

CR1985062401

## प रि प त्र क

मुंबई वित्तीय नियम १९५९ च्या नियम १५० प्रमाणे खर्चास मंजूरी देण्याच्या आदेशाच्या प्रती, मंजूरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याने लेखापरीक्षा कार्यालयात पाठविणे आवश्यक आहेत. दुय्यम अधिकाऱ्यांना वित्तीय शक्ती प्रदान करण्याच्या विकेंद्रीकरणाच्या परिणामामुळे महालेखापाल, मुंबई यांनी शासनाच्या असे निदर्शनास आणले आहे की, वित्तीय आणि इतर मंजूरी आदेशात व्यवहाराशी संबंध असलेल्या प्रमुख लेखाशीर्षाचा उल्लेख केला जात नाही. त्याचा परिणाम महालेखापालांच्या कार्यालयातील चुकीच्या कक्षास अथवा शाखेस पाठविण्यात आणि पर्यायाने प्रकरणाला अनावश्यक विलंब होण्यास होतो, तसेच महालेखापालांच्या कार्यालयात अनावश्यक पत्रव्यवहार निर्माण करण्यात सुध्दा होतो.

अनावश्यक विलंब आणि कालापव्यय सुध्दा टाळण्यासाठी शासन निदेश देत आहे की, व्यवहाराशी संबंधित असलेले प्रदान लेखाशीर्ष मंजूरी आदेशात निर्देशपूर्वक नमूद करावे, जेणेकरुन, पत्रव्यवहार महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई व महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर यांच्या कार्यालयात उचित शाखांना पोहोचेल.

सहाय्यक अनुदानविषयक मंजूरी आदेशाच्या दोन साक्षांकित प्रती सुध्दा महालेखापालांच्या कार्यालयात खालील पत्त्यावर पाठवाव्यात :-

१] महालेखापाल-१, महाराष्ट्र, [लेखा आणि अनुज्ञेयता] मुंबई-४०० ०२०,
२] महालेखापाल-१, महाराष्ट्र, [लेखा परीक्षा], मुंबई-४०० ०२०,
३] महालेखापाल-२, महाराष्ट्र, [लेखा आणि अनुज्ञेयता], नागपूर,
४] महालेखापाल-२, महाराष्ट्र, [लेखा परीक्षा] नागपूर,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

राजकुमारी मुखेजा,
कार्यासन अधिकारी,
वित्त विभाग.

प्रति,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.

---

क्र. लेखा/सीआर ११०४/अ-३/८५
पुणे, दिनांक २८/९/१९८५.

प्रत/- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख/सर्व अधीक्षक भूमि अभिलेख/सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सर्व ए.अ. यांना माहिती व मार्गदर्शनार्थ अग्रेषित.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म.रा.] पुणे यांचेकरिता.

प्रत/- सर्व कार्यासन अधिकारी जमाबंदी आयुक्त पुणे/ अभिलेखापाल.

पीएस/२०९८५.